MHND100005552026

# (निशाणी १ वरील आदेश)

(दिनांक १० माहे ऑगस्ट, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम viii नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील रामकिशन पि. माधवराव बेल्लाळे हे दिनांक ०२.०६.२०१८ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांव्यतिरिक्त मयत रामकिशन पि. माधवराव बेल्लाळे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना विविध शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम २ नुसार वारस प्रमाणपत्र देतांना अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर बॉम्बे रेग्युलेशन ऐक्टचे वाचन केल्यानंतर मी निष्कर्षास आलो आहे की, सदर नियमाअंतर्गत वारस प्रमाणपत्र देणे म्हणजे वारस, इच्छापत्र व व्यवस्थापक इत्यादींना औपचारिक मान्यता देणे होय.

४. अर्जदारांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ मयत रामकिशन पि. माधवराव बेल्लाळे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत (निशाणी १२), अर्जदार क्र.१ ते ३ यांचे आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती (निशाणी १३ ते १५) व दि. २४.०६.२०२६ रोजीचे 'दैनिक समिक्षा' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीसची मुळ प्रत (निशाणी १६) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

५.     अर्जदार क्र. ३ शिवकांता भ्र. माणिकराव नरंगले हिने तिचे पुरावा शपथपत्र (निशाणी ११) अभिलेखावर दाखल केले असून तिचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'दैनिक समिक्षा' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन (निशाणी १६) प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली परंतु कोणताही आक्षेप आला नाही. सबब, अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ हे मुले या नात्याने मयत रामकिशन पि. माधवराव बेल्लाळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत रामकिशन पि. माधवराव बेल्लाळे यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.08.10 16:18:27 +0530

(के. एस. खंडारे)
सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार

दि.१०.०८.२०२६